# पुणे शहरांत चार चाकी वाहन चोरी करणारे रेकॉर्डवरील गुन्हेगार यांना युनिट-५ गुन्हेशाखेकडून करणेत आले जेरबंद

युनिट-५,गुन्हेशाखेकडील पो.ना.गणेश बाजारे यांना त्यांचे खांस बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,हडपसर व त्याचे लगतचे भागांत चार चाकी चोरी करणारे इसम हे.गंगानगर स्मशान भुमीजवळ,फुरसुंगी,पुणे येथे पुढे मागे नंबर प्लेट नसलेले एका पल्सर मो.सा.वरुन जाणार असून त्यांचेकडे असलेली मो.सा.ही चोरीची असावी अशी माहिती मिळालेने सदर बातमीबाबत प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण,युनिट-५, गुन्हेशाखा,पुणे शहर यांनी खात्री व शहानिशा करुन आपले दिमतीत अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना सापळा रचणेबाबत योग्यतो आदेशपर मार्गदर्शन सुचनां देवून मिळाले माहितीप्रमाणे दोन इसम एका काळे रंगाचे पल्सर मोटार सायकलवरुन बातमीचे ठिकाणी येताच त्यांना ताब्यांत घेतले असतां त्यांनी आपली नावे अनुक्रमे १) विनायक ऊर्फ बापू रघुनाथ बोंबाळे,वय २९ वर्षे,धंदा-ड्रायव्हर रा.सध्या.द्वारा-संजय हाके,लक्ष्मी नामदेव निवास, स.नं.३६,सिताईनगर,मांजरी फार्म,ता.हवेली जि.पुणे मूळ रा.मु.पो.मगरवाडी, नकातेवस्ती ता.पंढरपुर जि.सोलापूर (मोटार सायकल चालक ) २) बिरु ऊर्फ प्रेम मधुकर जरग,वय ३१ वर्षे,धंदा-ड्रायव्हर रा.सध्या-द्वारा-शंकर माकर,पारगे बिल्डींग,तळमजला,विठठ्ल मंदिरासमोर, भांजी मंडईजवळ, उत्तमनगर,पुणे मूळ रा.मु.पो.कोन्हेरी ता.मोहोळ जि.सोलापुर (पाठीमागे बसलेला )असे सांगितले त्यांचे ताब्यांतील पल्सर मो.सा.१५० काळे व लाल रंगाचे पुढे मागे नंबर प्लेट नसलेली हिचेबाबत त्यांचेकडे विचारपूस करतां त्यांनी उडवाउडवीची उत्तरे दिलेने त्यांचेकडे सखोल तपास करतां त्यांनी ती आपले आणखी एक साथीदार नामेः-गणेश अरुण राऊत रा.पेन्नूर,ता.मोहोळ,जि.सोलापूर याचेसह गोंधळेनगर, हडपसर,पुणे येथून चोरलेचे निष्पन्न झालेने हडपसर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.६९१/२०१७ भा.दं.वि.क.३७९ प्रमाणेचा गुन्हा उघडकीस आलेने किं.रु.७५,०००/- एक बजाज पल्सर १५० व आरोपीचे ताब्यांत मिळालेले एकूण ३ मोबाईल हॅन्डसेट किं.रु.७,०००/-चे असा एकुण किं.रु.८२,०००/- चा मुद्येमाल त्यांचेकडून जप्त करणेत आलेले आहेत.

तरी वरील आरोपी अनु क्र.१ व २ यांना अटक करुन त्यांचेकडे युनिट-५ चे प्रभारी अधिकारी श्री.दत्ता चव्हाण व त्यांचेकडील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी कौशल्यपुर्ण तपास केला असतां त्यांनी व त्यांचा एक साथीदार नामेः-गणेश अरुण राऊत यांनी मिळून केलेले हडपसर पोलीस स्टेशनचे हद्दीतील ०२ स्विफ्ट डिझायर , ०१ महिंद्रा पिकअप ०१ तवेरा चोरी व लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे हद्दीतील ०१ तवेरा चोरी असे एकूण अधिक ०५ गुन्हे चारचाकी वाहन चोरीचे तपासांत उघडकीस आलेले आहेत.

तसेच अटक आरोपी पैकी बिरु ऊर्फ प्रेम मधुकर जरग यांचेवर यापुर्वी पुणे शहरांत एकूण ०६ गुन्हे चंदन चोरी व वरीलप्रमाणेचे वाहने चोरीचे गुन्हे असून तो सध्या लोणी काळभोर पोलीस स्टेशनकडील सन २०१५ व २०१६ मधील हायवा व तवेरा चोरीचे ०२ गुन्हयांमध्ये फरारी आहे. व गणेश अरुण राऊत यांचेवर पुणे शहरांत एकूण ११ गुन्हे दाखल असून त्यामध्ये चार चाकी वाहन चोरी,चंदन चोरी,जबरी चोरीचा प्रयत्न,शस्त्रांसह दरोडा,दरोडयाची तयारी यासारखे गंभीर गुन्हे दाखल असून तो सोलापूर शहर व ग्रामीण पोलीस ही त्याचे मागावर आहेत.

सदरची कामगिरी ही श्री. प्रदिप देशपांडे सो.अपर पोलीस आयुक्त गुन्हे, श्री.पंकज डहाणे पोलीस उप-आयुक्त, गुन्हे,पुणे,श्री. संजय निकम,सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-२ यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा,युनिट-५,पुणे कडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री.दत्ता चव्हाण, स.पो.निरी.महादेव वाघमोडे, स.पो.निरी.युवराज नांद्रे,पो.उप-निरीक्षक अकिल शेख,पोलीस हवालदार संतोष मोहिते,माणिक पवार, लक्ष्मण शिंदे,प्रविण शिंदे,राजेश रणसिंग,प्रदिप सुर्वे,सचिन घोलप,सिध्दराम कोळी,पोलीस नाईक महेश वाघमारे, प्रविण काळभोर ,गणेश बाजारे,नामदेव आंगज,प्रमोद घाडगे,अमजद पठाण,अंकुश जोगदंडे,संजय दळवी यांनी केलेली आहे.